**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग जळगांव.**
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. जळगांव, नविन बस स्थानकाचे वर, जिल्हा पेठ, जळगांव.
ई मेल dcjalgaon२३@gmail.com दुरध्वनी क्र. : (०२५७) २२२८२७३
वेबसाईट www.msrtc.gov.in दुरध्वनी क्र. : (०२५७) २२२६६०३

जा.क्र.राप/विनिज/आस्था/ ६०२१ दिनांक : १८/०९/२०२४

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना**
**रुजू आदेश**

प्रति,
चैताली उल्हास सोनवणे-
शिवाजीनगर जळगांव ता.जि.जळगांव
पोर्टलवरील नोंदणी क्र.४११८११६११५१.

विषय : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत **लेखाकार** या पदावर हजर होणेबाबत.
संदर्भ :-१.कौशल्य रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमाक संकीर्ण - २०२४/प्र.क्र.१०/व्याशि-३, दिनाक ०९.०७.२०२४
२ परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/धसं/४८०९ दि.३०.०७.२०२४

उपरोक्त संदर्भित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, "मा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" २०२४-२५ अंतर्गत आपली शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभागांतर्गत रा.प. **लेखा शाखा** येथे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून "मा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

१. सदर कार्य प्रशिक्षण कालावधी हा आपण रुजू झाल्यानंतर ६ महिने राहिल.
**दिनांक १९.०९.२०२४ ते दिनांक १८.०३.२०२५ पर्यत**
२. आपले विद्यावेतन शैक्षणिक पात्रतेनुसार रु.६०००, रु.८०००,रु १०,००० हे ऑनलाईन व्दारे आपल्या आधार संलग्न बॅंक खात्यामध्ये DBT व्दारे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांचे मार्फत अदा करण्यात येईल.
३. या योजने अंतर्गत प्रशिक्षण घेत असतांना आपणांस कोणतेही किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही.
४. या योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण कालावधीत उपस्थित राहणे अनिवार्य आहे, संबंधित शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे प्रशिक्षणार्थीस विद्यावेतन अदा करण्यात येईल. अपवादात्म परिस्थितीत प्रशिक्षणार्थी एका महिन्यात १० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी गैरहजर राहिल्यास सदर प्रशिक्षणार्थीस सदर महिन्याचे विद्यावेतन अदा करण्यात येणार नाही.
५. प्रशिक्षण कालावधीमध्ये या कार्यालयामार्फत जाहीर केलेली सुटी व अनुज्ञेय रजा यांचा अंतर्भाव राहील.
६. या योजने अंतर्गत आपणांस प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावा व आपली कौशल्यवृध्दी व्हावी व त्यामुळे आपणांस विविध क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात असा उद्देश आहे. परंतु, या प्रक्षिणानंतर "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कुठल्याही विभागांतर्गत येणाऱ्या कार्यालयांत [आगारात] किंवा इतर कोणत्याही आस्थपनेमध्ये आपणांस कायम स्वरुपाची नोकरी देण्याची कोणतीही हमी शासन देत नाही.

७. प्रशिक्षण कालावधीत या विभागामार्फत /कार्यालयाद्वारे वेळोवेळी सोपविण्यात [redacted] कामकाज करणे व दिलेल्या सुचनेची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील

८. तसेच ज्या उमेदवारांनी शिकाऊ उमेदवारी योजनेचा लाभ घेत असलेले व घेतलेले उमेदवार पात्र राहणार नाही.

या अटी व शर्ती आपणांस मंजूर असल्यास खालील दिलेल्या कागदपत्रांसहीत उपरोक्त नमूद ठिकाणी कार्यालयीन वेळेत पत्र प्राप्त होताच दोन दिवसांच्या आंत तात्काळ हजर व्हावे.

[ भगवान शंकर जगनोर ]
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन जळगांव.

प्रत :- मा. महाव्यवस्थापक [क.व.औ. स] रा.प. मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-०८ यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत :- मा. सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभाग जळगांव माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.

प्रत :- लेखा अधिकारी रा.प.जळगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- लेखा अधिकारी ............ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

श्री-चैताली उल्हास सोनवणे [प्रशिणार्थी] यांना आपल्या शाखेत/आगारात कर्तव्यावर हजर करुन घ्यावे.व त्यांचा रूजूवाती अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा. तसेच त्यांची हजेरी पत्रक या कार्यालयांस पाठविण्यात यावे.

[ भगवान शंकर जगनोर ]
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन जळगांव